01-05-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 30-04-2025 23:41 Page 1



निवडक




**मंगेशी : राज्यस्तरीय स्पेलिंग बी स्पर्धेत टॉप १० मध्ये स्थान मिळविल्याबद्दल मान्यवरांकडून पुरस्कार स्वीकारताना पारस वेलिंगकर.**

## स्पेलिंग बी स्पर्धेत पारस वेलिंगकरचे उत्तम यश

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**सावईवेरे दि. ३०** : मंगेशी येथील वागळे हायस्कूलचा विद्यार्थी पारस वेलिंगकर याने राज्यस्तरीय स्पेलिंग बी स्पर्धेत उत्तम यश संपादन केले आहे. जी सन इंटरनॅशनलतर्फे आयोजित केलेल्या प्रतिष्ठित गोवा स्टेट चॅम्पियनशिप ऑफ द स्पेलिंग बी स्पर्धेमध्ये टॉप १० स्कॉलर्समध्ये स्थान मिळविले आहे.

पारसने शालेय स्तरावरील स्पर्धा जिंकून आपला प्रवास सुरू केला, त्यानंतर त्याने उत्तर गोवा जिल्हा स्तरावर प्रशंसनीय विजय मिळविला. सातत्यपूर्ण उत्कृष्ट प्रदर्शन करीत तो पाचवी व सहावीत शिकत असताना सलग दोन वर्षे शालेय चॅम्पियन ठरला आहे. स्पेलिंग कौशल्याव्यतिरिक्त पारस शैक्षणिक क्षेत्रातही अव्वल ठरला. एस.सी.ई.आर.टी. पर्वरीतर्फे आयोजित इयत्ता चौथीच्या प्रज्ञाशोध परीक्षेत फोंडा तालुक्यात द्वितीय क्रमांक पटकावून शिष्यवृत्ती प्राप्त केली.गणिताच्या पेपरमध्ये ४० पैकी ३९ गुण मिळवून फोंडा तालुक्यात सर्वाधिक गुण मिळविण्याचा मान मिळविला. स्पेलिंग बी स्पर्धेतील यशाबद्दल वागळे हायस्कूलचे व्यवस्थापन, मुख्याध्यापक, शिक्षक, पालक – शिक्षक संघ यांनी पारसचे अभिनंदन केले आहे. सीबीएसई व आयसीएसई बोर्डाच्या विद्यार्थ्यांसोबत स्पर्धा आणि उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.त्याच्या क्षमतांना जोपासल्याबद्द्ल पालकांनी शिक्षकांचे आणि मार्गदर्शकांचे मनापासून आभार मानले आहेत.

---



**डिचोली : भारत विकास परिषद अधिकारग्रहण प्रसंगी सुहास वझे, प्रवीण झांट्ये, प्रवीण सावंत व इतर.**

## डिचोली येथील भारत विकास परिषद गोवा प्रान्तचे अध्यक्ष डॉ. प्रवीण सावंत

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**डिचोली, दि. ३०** : प्रत्येक भारतीयाने देव, देश आणी धर्म याना सर्वप्रथम मानताना आपल्या संस्कतीचे जतन करणे पहिले कर्त्यव्य आहे. तसेच आई वडिलांची सेवा ती जीवंत असताना करणे हे परम भाग्य समजावे असे विचार प्रसिद्ध हभप सुहास बुवा वझे यांनी झांट्ये महाविद्यालयाच्या स्पोर्ट्स कॉम्पेलेक्समध्ये आयोजित केलेल्या भारत विकास परिषद गोवा प्रान्त आणी डिचोली शाखेच्या दायित्व ग्रहण सोहळ्या प्रसंगी प्रमुख वक्ते यानात्याने बोलताना काढले

यावेळी प्रमुख पाहुणे प्रवीण झांट्ये, आतिथी पाहुणे म्हणून पश्चिम विभागाचे महेश केशव शर्मा, श्रीकृष्ण धोंड, प्रमोद येडवे, अश्विनी लामगावकर, गोवा प्रान्तचे प्रदीप लोटलीकर, विराज शेणवी, संदिप आझरेंकर, डॉ. प्रवीण सावंतआदि मान्यवर उपस्थित होते.

यावेळी प्रवीण झांट्ये यांनी सांगितले की, भारत विकास परिषद ही एकमेव अशी संस्था आहे जी भारतीय संस्कृती जपण्याचे कार्य करताना एक नवी दिशा देण्याचे काम करते

सुरूवातीला वंदे मातरम या राष्ट्रगीताने सुरुवात झाली तदनंतर दिप प्रज्वलनाने व स्वामी विवेकानंद व भारतमाता यांच्या तसबिरीला हार घालून उदघाटन करण्यात आले. नंतर महेश शर्मा यानी नाविन पदभार साभांळणाऱ्या पदाधिकाऱ्याना शपथ देवविली.

ह्यावेळी दहावीव बारावी परिक्षेत उज्वल यश मिळविलेले ऐंजल सुर्यवंशी, वेदा पेडणेकर, स्वानंदी सावंत, निधी कशाळीकर यांचा गौरव करण्यात आला तर सारेगमप स्पर्धेत गोव्याचे नाव उज्वल केलेले ऋषिकेश ढवळीकर व रामदास गोवेकर यांचा शाल, श्रीफळ व भेटवस्तू प्रदान करून सत्कार करण्यात आला.

ह्यावेळी महेश शर्मा, डॉ. प्रवीण सावंत व राजेंद सावईकर यांनी आपले विचार मांडले. गोवा प्रान्तचे अध्यक्ष म्हणून डॉ. प्रवीण सावंत यांची सर्वानुमते निवड झाली उपाध्यक्ष म्हणून श्रीकृष्ण धोंड,विराज शेणवी, सचिव प्रदिप लोटलीकर,मकरंद कामत, कोशाध्यक्ष संदिप आझरेंकर, संपर्क : स्वरूपा गदग, सेवा : श्रद्धा धोंड, संस्कार : योगेंद्र बांदेकर पर्यावरण अनिल कोथे व महिला सहभागिता म्हणून सुप्रिया केतकर यांची गोवा प्रान्तमध्ये निवड झाली. तर डिचोलीचे अध्यक्ष म्हणून राजेंद्र सावईकर व साचीव प्रमोद येडवे व खजिनदार म्हणून अश्वनी लामगावकर यांना शपथ देवविली.

सुरुवातीला पेहलगामयेथील भारतीया वर हल्ल्यात बळी पडलेल्याना एक मिनीट शांतता पाळून श्रद्धांजली वाहिली. कार्यकमाचे सूत्रसंचालन श्रद्धा धोंड व वैष्णवी चणेकर यानी केले तर स्वागत श्रीकृष्ण धोंड यानी केले पाहुण्यांची ओळख उज्वला आचार्य व योगेंद्र बांदेकर यानी करून दिली. तर आश्विनी लामगाव कर हिने केले.शेवटी राष्टगीताने सांगता झाली.भारत विकास परिषद अधिकार ग्रहण प्रसंगी सुहास वझे, प्रवीण झाट्ये, प्रवीण सावंत व इतर

---

## मिरामार येथे आज ‘स्वर गंगेच्या काठावरती’ कार्यक्रम

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. ३०** : मारुतीराय मिरामार ट्रस्टच्या श्री मारुतीराय मंदिरात मूर्तीप्रतिष्ठापनेचा वर्धापनदिन गुरुवार दि. १ मे रोजी साजरा होणार आहे. त्यानिमित्त संध्याकाळी ७ वाजता निषाद क्रिएशन निर्मित ‘स्वर गंगेच्या काठावरती’ हा विशेष कार्यक्रम होणार असून त्यात संभाजीनगर येथील नामवंत गायिका वर्षा जोशी, पंडित हृदयनाथ मंगेशकर व डॉ. सलील कुलकर्णी यांच्या कौतुकास प्राप्त झालेली कोकणातील प्रसिद्ध युवा गायिका अमृता पेडणेकर, सुर नवा ध्यास नवा चा टॉप पाचचा मानकरी नवाब शेख व गोव्याची प्रसिद्ध युवा गायिका दीप्ती साने गावस मराठी भावगीते, भक्तिगीते, नाट्यगीते, चित्रपटगीते, युगुलगीते पेश करतील. कवयित्री सोनाली सावळ देसाई परब या निवेदन करतील तर नितीन कोरगावकर तबला बाळकृष्ण मेस्त सिंथेसायझर अश्विन जाधव ऑक्टोपॅड दिगज बेणे संवादिनी यांची साथसंगत लाभणार आहे.

संगीता एम ए केलेल्या व अनेक शास्त्रीय व उपशास्त्रीय संगीत महोत्सवातून गायिलेल्या वर्षा जोशी प्रथितयश गायिका शुभा जोशी यांच्याकडे शास्त्रीय गझल गायनाची तालीम घेत आहेत.

स्वतः गीतकार, संगीतकार असलेली अमृता ही झी मराठी सारेगमपच्या लिटल चॅम्पमध्ये इयत्ता चौथीत असताना सहभागी झाली होती. जयपूर घराण्याच्या गायिका डॉ. विद्या एकसांबेकर यांच्या मार्गदर्शनाखाली ती संगीत अलंकार करतेय. हिने प्रसिद्ध गायिका प्रचला आमोणकर यांच्याकडून शास्त्रीय गायनाचे शिक्षण घेतले आहे व सध्या ती पुणे येथील प्रसिद्ध गायक ईश्वर घोरपडे यांच्याकडे शास्त्रीय गायन शिकत आहे.अभंग, नाट्यगीते ती उत्कृष्ट गाते.

# एसजीपीडीए मार्केटमध्ये कचऱ्याचा गंभीर प्रश्न कायम

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**मडगाव, दि. ३०** : अलिकडच्या काळात एसजीपीडीए मार्केटमध्ये लागलेल्या आगीच्या घटनेनंतरही बाजार परिसरातील कचऱ्याची समस्या गंभीरच राहिली आहे. स्वच्छता व सुरक्षिततेबाबतच्या प्रश्नांकडे लक्ष वेधूनही कोणतीही ठोस सुधारणा करण्यात आलेली नाही. त्यामुळे विक्रेते, ग्राहक आणि स्थानिक रहिवासी यांच्यात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

दक्षिण गोव्यातील सर्वाधिक वर्दळीच्या व व्यापारीदृष्ट्या महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या एसजीपीडीए मार्केट परिसरात कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न दीर्घकाळ प्रलंबित आहे. बाजारात जागोजागी साचलेला कचरा, ओसंडून वाहणारे कचराकुंड्या आणि दुर्गंधीमुळे परिसरात आरोग्य व पर्यावरणास गंभीर धोका निर्माण झाला आहे. अलिकडील आग ही याच निष्काळजीपणाचे दुष्परिणाम असल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत असून, त्यानंतर काही काळ चर्चेला आलेली स्वच्छतेची समस्या पुन्हा दुर्लक्षित झाली आहे. या मार्केटमध्ये व्यवसाय करणाऱ्या विक्रेत्यांनी यासंदर्भात तीव्र नाराजी व्यक्त केली. आगीच्या घटनेनंतर अधिकाऱ्यांनी तातडीच्या उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले होते, मात्र प्रत्यक्षात कोणतीही ठोस कारवाई झाल्याचे दिसून येत नाही, असे विक्रेत्यांचे म्हणणे आहे.

ती आग एक इशारा होता. सुरुवातीला काही अधिकारी बाजारात आले, पाहणीही केली, पण त्यानंतर काहीच झाले नाही. घाण व दुर्गंधी पूर्ववत आहे. ग्राहकही काही भागांमध्ये जाणे टाळत आहेत, अशी प्रतिक्रिया भाजी विक्रेती फिलोमेना डायस यांनी दिली. दरम्यान, वाढत्या तापमानामुळे आग व संसर्गजन्य आजारांचा धोका अधिकच



वाढत असल्याची चिंता स्थानिक रहिवाशांनी व्यक्त केली आहे. काटेकोर उपाययोजना आणि सातत्यपूर्ण देखरेख आवश्यक आहे. फक्त पाहणी व फोटोसेशन करून प्रश्न सुटत नाहीत, अशी प्रतिक्रिया रहिवासी मिलाग्रेस फर्नांडिस यांनी दिली.

पर्यावरण कार्यकर्त्यांनीही या परिस्थितीवर तीव्र संताप व्यक्त करत मडगाव नगरपरिषद व एसजीपीडीए प्रशासनाची निष्क्रियता उघड केली आहे. बाजार परिसरात बेकायदेशीर कचरा टाकणे रोखण्यासाठी सीसीटीव्ही यंत्रणा बसवणे, दररोज कचरा संकलनाची प्रक्रिया काटेकोरपणे राबवणे आणि नियमभंग करणाऱ्यांवर कठोर दंड लावणे, अशी मागणी त्यांनी केली आहे. आगीच्या घटनेनंतर एसजीपीडीएने अद्याप कोणतेही अधिकृत निवेदन जाहीर केलेले नाही. मात्र, याआधी महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी बाजारात मोठ्या प्रमाणात निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे व्यवस्थापन ही एक गंभीर समस्या असल्याचे मान्य करत स्वच्छता संस्थांशी समन्वय साधण्याचे आश्वासन दिले होते.

मडगाव नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, कचरा नियमितपणे संकलित करण्यात येतो. तथापि, प्रत्यक्षात परिस्थितीत कोणतीही लक्षणीय सुधारणा न झाल्याने नागरिक व व्यावसायिकांतून संताप व्यक्त होत आहे. दक्षिण गोव्यातील प्रमुख व्यापारी केंद्र असलेल्या या बाजारपेठेत स्वच्छता आणि सुरक्षितता बहाल करण्यासाठी प्रशासनावर दबाव वाढत असून, तातडीने ठोस उपाययोजना करण्याची मागणी सर्वस्तरांतून होत आहे.

# ई–बसमध्ये अपंगांसाठी अपुरी सुविधा

## चालकांवर ताण | प्रत्यक्ष तपासणीत अनेक व्यावहारिक अडचणी व त्रुटी

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. ३०** : इमॅजिन पणजी स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट लिमिटेड यांनी राजधानीत सुरू केलेल्या ई–बस सेवेला मिळालेल्या प्रतिसादाबाबत समाधान व्यक्त करताना, पहिल्या नऊ महिन्यांत ४८ इलेक्ट्रिक बसेसद्वारे तब्बल १.९३ कोटी रुपये उत्पन्न झाल्याचा दावा केला. मात्र या दाव्यांनंतर हेराल्ड मिडियाच्या प्रत्यक्ष तपासणीत अनेक व्यावहारिक अडचणी आणि त्रुटी समोर आल्या आहेत.

सर्व बसेस ‘लो–फ्लोअर’ आणि व्हीलचेअर सुलभ रॅम्पने सज्ज असल्याचा दावा इमॅजिन पणजी कडून करण्यात आला होता. मात्र वास्तुस्थिती ,याला दुजोरा देत नाही. काही रॅम्प बंद अवस्थेत असल्याचे तसेच चालक एकटे असल्याने अपंग प्रवाशांना मदत करणारा कोणताही कर्मचारी नसल्याचे समोर आले आहे.

डिसॅबिलिटी राइट्स असोसिएशन ऑफ गोवा (ड्रॅग)चे अध्यक्ष एव्हेलिनो डिसा यांनी हेराल्ड मिडियाशी बोलताना सांगितले, बसमध्ये रॅम्प असले तरी ते वापरण्यास कोणीच उपलब्ध नसते. चालक एकटाच असल्याने तो बसमधून बाहेर येऊन मदत करू शकत नाही. त्यामुळे व्हीलचेअर वापरणाऱ्या प्रवाशांसाठी ही सेवा प्रत्यक्षात उपयुक्त ठरत नाही. त्यांनी पुढे सुचवले की, प्रत्येक बसमध्ये कंडक्टर असणे आवश्यक आहे, जे व्हीलचेअर चढवण्यासाठी मदत करू शकतील. कंडक्टर–लेस संकल्पना सामान्य प्रवाशांसाठी लागू शकते, मात्र अपंग प्रवाशांसाठी नाही, असे ते म्हणाले.

हेराल्ड मिडियाशी बोलताना अनेक बस चालकांनी कंडक्टरशिवाय सेवा चालवण्यातील अडचणी मांडल्या. एका चालकाने सांगितले, आम्हीच तिकीट देतो, पैसे घेतो आणि पीओएस मशीन वापरतो. प्रवासी तक्रार करतात, पण आमच्यावर अतिरिक्त जबाबदारी येते.

दुसऱ्या चालकाने स्पष्ट केले की, गर्दीच्या वेळी किंवा अपंग प्रवाशांना मदतीची गरज असताना, चालक काय करणार? वाहन चालवायचे, तिकिट द्यायचे की लोकांना मदत करायची? या चालकांनी असेही नमूद केले की कंडक्टर असतील, तर बेरोजगार युवकांना रोजगाराची संधीही मिळेल. या आधी इमॅजिन पणजी स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट लिमिटेडचे सीईओ संजीत रॉड्रिग्ज यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, गेल्या नऊ महिन्यांत ई–बस सेवेला चांगला प्रतिसाद मिळाला असून मार्च २०२५ पर्यंत महिन्याचे उत्पन्न २७.२४ लाख रुपये इतके झाले आहे. जुलै २०२४ मध्ये हे उत्पन्न केवळ ६.४९ लाख रुपये होते. त्यांनी स्पष्ट केले की, डिजिटल पेमेंट्सचा वाटा आता ३४ टक्क्यांवर पोहोचला आहे.ई–बसमधून जुलै २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीत एकूण १६,१९,७९६ प्रवाशांनी प्रवास केला असल्याचे त्यांनी सांगितले.रोख व्यवहार नाकारल्याच्या तक्रारीबाबत विचारले असता रॉड्रिग्ज म्हणाले, ड्रायव्हर रोख रक्कम स्वीकारतो, पण फक्त बस थांबलेली असताना. चालू बसमध्ये हे शक्य नाही.अपंगांसाठीच्या सुविधांबाबत ते म्हणाले, सर्व ४८ बसेस कमी मजल्याच्या आहेत आणि प्रत्येकात व्हीलचेअरसाठी जागा व रॅम्प आहेत. गरज असल्यास ड्रायव्हरला विनंती करावी लागते.बस स्टॉप डिझाइनसंदर्भात केटीसीएल व कंत्राटदारांमध्ये काही मतभेद असल्याचे रॉड्रिग्ज यांनी मान्य केले. २ मे रोजी बैठक घेण्यात येणार असून वाद मिटवण्याचा प्रयत्न केला जाईल, असे ते म्हणाले.

# नाल्याची सफाई झाली नाही तर पूर येण्याची भीती



■ *टीम दैनिक हेराल्ड*

**फोंडा, दि. ३०** : फोंडा तालुक्यातील नागझर कुर्टी येथील स्थानिक नागरिकांमध्ये पावसाळ्यात पूर येण्याची गंभीर भीती आहे. नाल्याच्या खोऱ्यात मोठमोठ्या झाडांच्या पडलेल्या फांद्या आणि प्लास्टिक कचऱ्यामुळे नाला तुंबला आहे, ज्यामुळे पुराची संभाव्य स्थिती निर्माण झाली आहे. दरवर्षी येणाऱ्या पुरामुळे स्थानिकांचा मनस्ताप वाढला असून, आपत्ती व्यवस्थापन पथकाने त्वरित कारवाई करण्याची मागणी केली आहे.

स्थानिकांनी निदर्शनास आणून दिले की, नाल्याच्या खोऱ्यात अनेक जिवंत आणि सुकी झाडे उन्मळून पडली आहेत. यामुळे नाल्याचा प्रवाह रोखला जात असून, पुराचा धोका अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे. याचप्रमाणे, परिसरातील संरक्षक भिंतीचा काही भागही कोसळल्यामुळे आणखी एक संकट उभं राहिलं आहे.

नागझर फोंडा येथील कल्व्हर्टच्या खाली असलेल्या नाल्यात साचलेला कचरा आणि लाकडाचे तुकडे या समस्येवर स्थानिकांनी चिंता व्यक्त केली आहे. ते म्हणाले की, पावसाळ्यात परिसरातील मंदिर आणि घरांना पाणी येऊ नये म्हणून नाल्याच्या काठावर साचलेला कचरा आणि सुक्या लाकडाची झाडं त्वरित साफ केली जावीत. त्यांची प्रमुख मागणी अशी आहे की, नाला आणि त्याच्या आसपासच्या भागाची योग्य प्रकारे सफाई करणे आवश्यक आहे.

दरवर्षी या भागात पूर येतो आणि गेल्या काही वर्षांत अनेक घरं पाण्याखाली गेली होती. याव्यतिरिक्त, नाल्याच्या काठावरील महादेव मंदिरही पाणी घालून बुडत असल्याने स्थानिकांची चिंता आणखी वाढली आहे. स्थानिकांनी प्रशासनाकडे निवेदन देऊन येत्या पावसाळ्यात पूरप्रवृत्त परिस्थिती टाळण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे.

# कळंगुट पंचायतीकडून मान्सूनपूर्व गाळ काढण्याचे काम सुरू

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**कळंगुट, दि. ३०** : कळंगुट पंचायतीने बुधवारी साळगाव–कळंगुट सीमेपासून आगरवाडा पर्यंत २५ लाख रुपये खर्चाच्या नाल्यांचे मान्सूनपूर्व गाळ काढण्याचे काम सुरू केले. कळंगुटचे सरपंच जोसेफ सिक्वेरा यांनी याबद्दल माहिती दिली. त्यांनी सांगितले की, कळंगुटमध्ये असलेल्या नाल्यांचा गाळ गेल्या अनेक वर्षांपासून काढण्यात आलेला नाही, आणि यामुळे परिसरातील पाणी वाहिन्यांचे अडथळे निर्माण झाले आहेत.

आम्ही साळगाव सीमेपासून आगरवाडा आणि बागा नदीकडे पाणी सुसंवाहित होईल यासाठी गाळ काढण्याचे काम सुरू केले आहे. आगरवाडोपर्यंत असलेले सर्व नाले स्वच्छ आणि मुक्त केले जातील, असे सरपंच जोसेफ सिक्वेरा यांनी सांगितले.

तसेच, जलसंपदा विभागाकडे (डब्ल्यूआरडी) नाल्यांसाठी एक संरक्षक भिंत बांधण्याचा प्रस्ताव पाठविण्याचा विचार केला गेला आहे, ज्यामुळे कोरड्या महिन्यांत पाणी टिकून राहील आणि अधिक उपलब्धता होईल. सिक्वेरा यांनी या संदर्भात पुढे सांगितले की आम्ही सर्व नागरिकांना विनंती करतो की ते नाल्यांमध्ये सांडपाणी किंवा कचरा टाकू नयेत. त्यांचे सहकार्य आवश्यक आहे.

कळंगुटचे जैवविविधता समिती उपाध्यक्ष सदस्यांनीही याबाबत महत्त्वपूर्ण माहिती दिली. त्यांनी सांगितले की, मोटार झऱ्याला वारसा स्थळ म्हणून घोषित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. बोआ व्हिएग टेकडीच्या पायथ्याशी असलेला हा झरा पाण्याच्या उपचारात्मक गुणधर्मांसाठी प्रसिद्ध आहे.

गाळ काढण्यामुळे शेतकऱ्यांना देखील फायदेशीर परिणाम होणार आहेत. नाले बुजल्यामुळे शेतात पाणी साचले जाऊन ते वापरायला अडचण निर्माण होत होती. आता गाळ काढल्यामुळे पाणी साचणार नाही आणि सिंचनासाठी अधिक पाणी उपलब्ध होईल, असे जैवविविधता समिती सदस्यांनी स्पष्ट केले.

# साखळीत ‘पाणी आडवा पाणी जिरवा’ प्रकल्पास प्रारंभ

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**डिचोली, दि. ३०** : साखळी रवींद्र भवनतर्फे जलस्त्रोत खात्याच्या सहकार्याने रवींद्र भवनच्या समोर पाणी आडवा पाणी जिरवा व बोअरवेल या प्रकल्पाचा प्रारंभ अक्षय तृतीयेच्या शुभमुहूर्तावर मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या हस्ते करण्यात आला. सरकारी आस्थापनामध्ये असा प्रकल्प सुरू करणारे साखळी व डिचोलीतील रवींद्र भवन हे पहिले सरकारी अस्थापन ठरले आहे. या प्रकल्पाचे मुख्यमंत्र्यांनी कौतुक केले.

यावेळी रवींद्र भवनचे उपाध्यक्ष दत्तराम चिमुलकर, संचालक अतुल मळीक, दिनकर घाडी, शशिकांत नार्वेकर, श्रीरंग सावळ, सातू माईणकर, स्नेहा देसाई, रवीराज च्यारी, जलस्त्रोत खात्याचे कनिष्ठ अभियंता विनोद भंडारी व इतरांची उपस्थिती होती.



**साखळी : ‘पाणी आडवा पाणी जिरवा’ प्रकल्पाचा प्रारंभ करताना मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत. सोबत दत्ताराम चिमुलकर, अतुल मळीक, दिनकर घाडी, स्नेहा देसाई, अभियंता विनोद भंडारी, श्रीरंग सावळ, सातू माईणकर व इतर.**

गोव्यात पाऊस भरपूर पडतो परंतु या पावसाचे पाणी साठवून त्याचा पुन्हा उपयोग करण्याचा विचार कोणीही करत नाही. किंबहुना केवळ सरकारी पातळीवर नळांद्वारे मिळणाऱ्या पाण्यावरच सर्वांची भिस्त असते. पावसाळी पाणी साठवून स्वतः व इतरांसाठीही त्याचा वापर व्हावा, यासाठी सरकारही आशावादी आहे. अशा प्रकल्पांना सरकारही सदैव मदत करण्यासाठी अग्रेसर असून इतरही सरकारी स्थापनांनी असे प्रकल्प साकारण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी केले. त्याचबरोबर मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करून पर्यावरण वाढवण्याचेही काम करावे, असेही यावेळी मुख्यमंत्र्यांनी म्हटले.

दत्ताराम चिमुलकर यांनी सांगितले की, रवींद्र भवनची वास्तू व परिसर मोठा आहे. या परिसरात पडणाऱ्या पावसाचे पाणी हे गटारातून वाहून नाल्याद्वारे नदीला मिळते. या पाण्याचा उपयोग पाणी आडवा पाणी जिरवा या मोहिमेअंतर्गत एक विहीर खोदून साठवण्यासाठी करण्यात येणार आहे. व त्याच्या बाजूला बोअरवेल मारून हे पाणी रवींद्र भवनच्या ठराविक जागेवर टाक्या उभारून त्यात साठवण्यात येणार. हे पाणी रवींद्र भवनसाठी वापरात आणण्यात येणार आहे. त्यामुळे नळाद्वारे वापरात येणारे पाणी कमी होणार व नळाच्या बिलांचाही खर्च कमी होणार.

जलस्रोत खात्याचे कनिष्ठ अभियंता विनोद भंडारी यांनीही प्रकल्पाची माहिती दिली. संचालिका स्नेहा देसाई यांनी सर्वांचे स्वागत केले. सूत्रसंचालन सातू माईणकर यांनी केले. तर संचालक अतुल मळीक यांनी आभार मानले. या प्रकल्पाला लवकरच सुरुवात करण्यात येणार असून एक ते दीड महिन्यातच हा प्रकल्प पूर्ण होणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.


**अमूल दुधाच्या किंमतीमध्ये बदल करण्यात येत आहेत.**

| प्रकार | SKU | सध्याची MRP* (₹) | सुधारित MRP* (₹) |
|---|---|---|---|
| अमूल म्हशीचं दूध | 500 मिली | 36 | 37 |
| | 1 लीटर | 71 | 73 |
| अमूल गोल्ड | 500 मिली | 34 | 35 |
| | 1 लीटर | 67 | 69 |
| अमूल ताजा | 500 मिली | 27 | 28 |
| | 1 लीटर | 53 | 55 |

*एमआरपी (सर्व करांसह). अटी लागू.

**नवीन किंमती 1 मे 2025 रोजी सकाळपासून गोवा आणि आसपासच्या मार्केट मध्ये लागू होतील.**




अमूल दूध

Amul The Taste of India

दुधाच्या उत्पादनाच्या खर्चामध्ये वाढ झाल्यामुळे आम्ही आमच्या दुधाच्या किंमतीमध्ये वाढ केली आहे. कोणत्याही खुलाशासाठी आम्हाला येथे कॉल करा - 1800-258-3333/ ई-मेल:customercare@amul.coop